महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. मासं/रवका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
**दिनांक :**

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६३४ दिनांक ०८/१२/२०२१

**विषय:- महावितरण कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या वाहन भत्त्या करीता आवश्यक असणाऱ्या वाहनाच्या कागदपत्रांतील अटीमध्ये अंशत: सुधारणा करणेबाबत.**

**संदर्भ :-** १) सा.आ.क्र. ८९(क) दि. ०३.०३.१९७९
२) सा.आ.क्र. ९०(क) दि. ३१.०३.१९७९
३) सा.आ.क्र. १२४(क) दि. ०६.०१.१९९०
४) सा.आ.क्र. १५१(क) दि. ३१.१२.१९९८

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व तद्नंतर महावितरण कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणारे वाहन भत्ते हे कर्मचारी सेवाविनियम क्र. ७१ अंतर्गत सा.आ.८९(क) दि.०३.०३.१९७९, सा.आ.क्र.९०(क) दि.३१.०३.१९७९, आणि सा.आ. १५१ (क) दि.३१.१२.१९९८ अन्वये अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या संवर्गानुसार वाहन भत्त्या बाबतच्या अटी व मर्यादा निश्चीत करण्यात आलेल्या आहेत व त्या अनुषंगाने त्यामध्ये कालपरत्वे वेळोवेळी बदल ही करण्यात आलेले आहे.

२. वाहन भत्ता मिळणेबाबतच्या अटी व शर्ती नुसार अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे स्वत:चे वाहन असणे बंधनकारक आहे. सा.आ.क्र.८९(क), ९०(क), १५१(क) नुसार वाहन भत्ता मिळेल अशा अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे दोन चाकी वाहन नसल्यास परंतु संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे चार चाकी वाहन आहे व सदर वाहनाचा वापर कंपनीच्या कामाकरीता निकडी नुसार करतात अशा अधिकारी व कर्मचारी यांना दोन चाकी वाहनास ठरवुन देण्यात आलेला वाहन भत्ता मिळावा या उद्देशाने वाहन भत्त्यासाठी (Conveyance Allowance) लागणाऱ्या वाहनांच्या कागदपत्रांची अटीत बदल करुन त्यांत दुचाकी अथवा चार चाकी वाहनाच्या कागदपत्रांची पूर्तता करण्याच्या अटीवर वेतनगट - I,II,III मधील राज्य सेवाज्येष्ठतेमधील अधिकारी व कर्मचारी यांना वर्गीकरणानुसार त्यांना दुचाकी वाहन भत्ता मंजुर करण्यात यावा याबाबतच्या प्रस्तावास सक्षम अधिकारी यांनी मंजुरी दिली आहे. सामान्य आदेश क्र. ८९ दि. ०३.०३.१९७९ आणि सा.आ. क्र. ९० दि. ३१.०३.१९७९ अनुसार सोबत जोडलेल्या परिशिष्टका मधील परिच्छेद क्र. ०३ हा पुढील प्रमाणे वाचावा.

**" iii) सदर भत्ता अदा करण्यात येईल जर संबधित अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे मोटार सायकल / स्कूटर अथवा चार चाकी वाहन स्वत:च्या मालकीचे असेल व त्याची चांगली देखभाल केली असेल आणि वाहन कार्यालयीन प्रवासासाठी वापरले असेल आणि त्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र त्याने संबंधित आहरण आणि संवितरण अधिकाऱ्याला (उदा. कार्यकारी अभियंता, अधिक्षक अभियंता, उपमुख्य अभियंता किंवा मुख्य अभियंता जसे असेल तसे) प्रत्येक महिन्यात सक्षम अधिकाऱ्याने ठरविलेल्या तारखेला अथवा त्यापूर्वी लेखी स्वरूपात दिले असेल."**

३. सबब, क्षेत्रीय कार्यालयातील सर्व संबंधित अधिकारी यांना निर्देशित करण्यात येते की, सा.आ.क्र.८९(क), ९०(क), १५१(क) नुसार देण्यात येणाऱ्या वाहन भत्त्या करीताच्या दुचाकी वाहनाची अट **०१ जानेवारी २०२२** पासून वरील प्रमाणे शिथिल करण्यात येत आहे. परंतु सदरहु अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे वाहन कंपनीच्या कामाकरीता वापर करीत आहे असे हमीपत्र सक्षम अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील. सा.आ.क्र.८९(क), सा.आ.क्र. ९०(क) व सा.आ.क्र. १५१(क) मधील इतर अटी व शर्ती कायम राहतील.

४. **वाहन भत्याच्या फक्त अटीत सुधारणा करण्यात आलेली असुन वाहन भत्याच्या रक्कमेत कोणताही बदल केलेला नाही.**

५. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**(अ.म.भादीकर)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर :**

१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

**प्रत सस्नेह रवाना :**

१) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना :**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
७) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.